दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ● मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com
● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार दि.१८ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -६१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# कामे केली असती तर दौरे करायची वेळ आली नसती:उदयनराजेंचा पवारांना टोला

## योजनांवर टीका करणाऱ्यांवर साधला निशाणा



**सातारा (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रात फुल स्विंग आणि फुल स्विपध्ये महायुतीचे सरकार येईल, असा विश्वास खासदार उदयनराजे भोसले यांनी व्यक्त केला आहे. विरोधकांकडे बोलण्यासाठी मुद्दे नसल्यामुळे ते योजनांवर टीका करत आहेत. विरोधक जर योजनांना नावे ठेवत आहेत, तर त्यांनी त्या योजना का आणल्या नाही? असा सवालही उदयनराजे यांनी केला. तसेच त्यांनी शरद पवारांबाबतही भाष्य केले. शरद पवारांनी कामे केली असती तर त्यांना आता इतके दौरे करावे लागले नसते, असा टोला उदयनराजे यांनी लगावला आहे.

उदयनराजे भोसले यांनी शिवेंद्र राजे यांचा प्रचार करणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, मी आणा शिवेंद्र राजे आम्ही आमचे काम करत आहोत. आम्ही अनेक कामे मार्गी लावली आहेत. आमचे काम हाच आमचा अजेंडा आहे. जिल्ह्यातल्या प्रत्येक मतदारसंघात मी फिरणार असून जिथे गरज लागेल तिथे मी प्रचार करणार असल्याचे उदयनराजे म्हणाले.महाराष्ट्रात फुल स्विंग आणि फुल स्विपध्ये महायुतीचे सरकार येईल, असा उदयनराजे यांनी व्यक्त केला. पुढे ते म्हणाले, विरोधकांकडे बोलण्यासाठी मुद्देच नाहीत, त्यामुळे ते योजनांवर टीका करत आहेत. जर योजनांना हे नावे ठेवत आहेत तर त्यांनी त्या योजना का आणल्या नाही? असा सवालही त्यांनी विरोधकांना विचारला आहे. स्वतः कुठल्या योजना आणायच्या नाहीत. दुसऱ्याने आणल्या तर त्याला नावे ठेवायची आणि टीका करत बसायची एवढेच यांना जमते. असा टोलाही त्यांनी लगावला. उदयनराजे यांनी शरद पवार यांच्यावरही भाष्य केले आहे. शरद पवारांचे पश्चिम महाराष्ट्रात दौरे वाढले आहेत तर वाढू द्या. लोकशाही त्यांना दौरे काढण्याचा अधिकार आहे. मात्र दौरे का वाढले आहेत? याचा विचार त्यांनी केला पाहिजे, असे उदयनराजे म्हणाले. त्यांनी कामे केली का? ती केली असती तर इतके दौरे करावे लागले नसते. कृष्णा खोऱ्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता, त्यावेळी शरद पवारांनी तो का केला नाही? असा सवाल त्यांनी विचारला. शरद पवारांनी कामे केली असती तर त्यांना सांगता आली असती. ती नाहीत म्हणून त्यांना दौरे वाढवावे लागत आहेत, असा टोला उदयनराजे यांनी शरद पवारांना लगावला आहे. महायुतीने कामे केली आहेत त्यामुळे महायुतीने रिपोर्ट कार्ड आणले आहे. यांनी काही कामेच केलेली नाहीत, त्यामुळे हे टीका करत आहेत. असेही उदयनराजे यांनी म्हटले आहे.

# धनराज अर्बन बँकेचा वर्धापन दिन साजरा

## पाचव्या वर्षात यशस्वी वाटचाल

**केज । प्रतिनिधी**



तालुक्यातील कोरडेवाडी येथील धनराज अर्बन निधी मल्टिपर्पज बँकेचा वर्धापन दिन विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर मुख्य कार्यालयात संपन्न झाला. सुरवातीला धनलक्ष्मीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी बँकेचा गतवर्षाचा लेखाजोखा व वर्षभराची उलाढाल सभासदसमोर मांडली. तसेच संस्थेची पुढील वाटचाल कशी असेल या बद्दल माहिती दिली. अल्पावधीतच नावलौकिकास पात्र ठरलेली संस्था म्हणून अर्थव्यवस्थेत आपली वेगळी ओळख निर्माण केलेली संस्था म्हणून आज धनराज अर्बन सभासदांच्या विश्वासास पात्र ठरली आहे. आज संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त गावातील होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. व चहापणाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, सचिव, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग, सभासद व गावातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळी तालुक्यात आदर्श आचारसंहितेची ऐशी कि तैशी

## केंद्रीय निवडणूक आयोग याकडे लक्ष देईल काय?–बालासाहेब जगतकर

**परळी । प्रतिनिधी**



परळी तालुक्यात आदर्श आचारसंहितेची ऐशी कि तैशी होत असून केंद्रीय निवडणूक कार्यालय याकडे लक्ष देईल काय अशी ही चर्चा येथील नागरिकांतून होताना दिसत आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका जाहीर होऊन ७२ तासाच्या वर झाले असता ही परळी शहर व तालुक्यात अनेक ठिकाणी सत्ताधारी पक्षाचे पोस्टर्स व प्रचाराचे माध्यम आढळून येत असून याला एकमेव कारण म्हणजे स्थानिक चे अधिकारी व कर्मचारी असल्याचे सांगण्यात येत आहे त्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी हे याकडे लक्ष देतील काय कारण परळी शहर व तालुक्यातील तहसील कार्यालय पंचायत समिती व नगरपालिका येथील विविध अधिकाऱ्यांच्या तात्काळ बदल्या करण्यात याव्यात कारण सध्या होऊ घातलेल्या निवडणुका ह्या नी पक्षपाती व खुल्या वातावरणात झाल्या पाहिजेत यासाठी निवडणूक आयोगाचे निर्देश असून ज्या कार्यालयात तीन वर्षापेक्षा जास्त अधिकाऱ्याचा कार्यकाळ झालेला आहे व जे अधिकारी स्थानिक चे रहिवासी आहेत अशांच्याही तात्काळ बदल्या करण्यात याव्यात असे आदेश असतानाही जिल्हा निवडणूक अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असून केंद्रीय निवडणूक आयोग याकडे लक्ष देतील काय ? कारण परळी विधानसभेत आचारसंहिता लागली असतानाही याची अंमलबजावणी होताना दिसत नसून सत्ताधारी पक्षाच्या पायाखालचे भावले येथील अधिकारी बनल्याचे दिसत असल्याची माहिती ही प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली असल्याची माहिती साप्ताहिक मानपत्रचे संपादक बालासाहेब जगतकर यांनी दिली आहे.

### केज येथे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषद

# एकूण ३ लाख ८५ हजार ८१ मतदारा सह ६ तृतीय पंथी आणि ६ हजार २९६ नव मतदार बजावणार मतदानाचा हक्क

## ४२० मतदान केंद्रा पैकी १८ मतदान केंद्र संवेदनशील

**केज । सचिन भालेराव**



केज येथे विधासभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकी संदर्भात माहिती देण्यासाठी निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी पत्रकार परिषदे घेवून माहिती दिली.

केज विधान सभा निवडणुकीची माहिती देण्या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी दि. १७ ऑक्टोबर रोजी केक तहसील कार्यालयाच्या सभागृहात पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी त्यांनी सांगितले की, केज विधानसभा मतदार संघ हा अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. या मतदार संघात केज, अंबाजोगाई आणि बीड तालुक्यातील काही गावांचा समावेश असून त्या सर्वांचा मिळून केज विधानसभा मतदार संघ तयार झालेला आहे. केज मतदार संघात ऐकूण ३ लाख ८५ हजार ८१ एवढी मतदार संख्या आहे. त्या पैकी २ लाख १६ हजार ३२ पुरुष तर १ लाख ८३ हजार ४४३ महीला आणि तृतीय पंथी ६ मतदार आहेत. त्या पैकी सर्वात जास्त मतदार संख्या ही केज तालुक्यातील आहे. ती संख्या २ लाख ११ हजार ४८९ एवढी आहे. त्या पैकी असून १ लाख १० हजार ९७० पुरुष आणि १ लाख ५१८ महीला तर १ तृतीय पंथी. तसेच त्या खालोखाल अंबाजोगाई तालुक्यातील एकूण मतदार १ लाख ३८ हजार ७३१ अशी आहेत. त्या पैकी ७२ हजार ३० पुरुष तर ६६ हजार ६९६ महीला आणि ५ तृतीय पंथी यांचा समावेश आहे. बीड तालुक्यातील मतदारांची संख्या कमी असून एकूण ३४ हजार ६८१ मतदार आहेत. त्या पैकी १८ हजार ६३२ पुरुष तर १६ हजार २२९ महीला मतदार आहेत.

या मतदार संघात ४२० मतदार केंद्र असून त्या पैकी १८ मतदान केंद्र हे संवेदनशील मतदान केंद्र आहेत. एकूण मतदान केंद्रा पैकी ५०% मतदान केंद्रावर सीसिटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे. तसेच मतदार संघाच्या प्रवेशद्वारावर मुख्य रस्त्याने प्रवेश होत असलेल्या अंबासाखर कारखाना वाघाळा, कासारी पाटी, नेकनुर आणि मांगवडगाव पाटी येथे स्थिर पथके तैनात करण्यात येत आहेत.

अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दीपक वजाळे यांनी दिली. यावेळी त्यांचे सोबत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे, केजचे तहसीलदार राकेश गिड्डे, गट विकास अधिकारी प्रियांका टोंगे आणि समृद्धी दिवाणे या उपस्थित होत्या.

लोकसभा निवडणुकी नंतर केज मतदार संघात ६२९६ नव मतदारांची वाढ झालेली आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी केज विधानसभा मतदार संघात ३ लाख ७८ हजार ८८८५ मतदार होते. त्यात वाढ होवून आता ३ लाख ८५ हजार ८१ मतदार संख्या झाली आहे.

दिव्यांग आणि वयोवृध्द नागरिकांसाठी घरी मतदान करण्याची व्यवस्था: केज विधानसभा मतदार संघात २ हजार ११६ मतदार दिव्यांग आहेत. तर ८५ वर्षा पेक्षा जास्त वय असलेले ८ हजार २८९ मतदार असून त्यांना घरी मतदान करण्याची सोय करण्यात आलेली आहे.

विधान सभा लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराला ४० लाख रु. खर्चाची मर्यादा असून उमेदवारी दाखल करताना ५ हजार रु अनामत रक्कम असणार आहे.

आपले नाव यादीत तपासा :- मतदानाचा टक्का वाढावा म्हणून निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदारांनी यादीत त्यांचे नाव तपासून पहावे आणि जर नाव नसेल तर १९ ऑक्टोबर पर्यंत अर्ज दाखल केल्या नंतर पुरवणी यादीत नाव समावेश होणार आहे.निवडणुकी दरम्यान २२ ऑक्टोबर पासून व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार असून निवडणुकीचे सर्व परवाने हे एक खिडकी योजने द्वारे एकाच कार्यालयातून देण्यात येणार आहेत.

### २००७ सेझ आंदोलन प्रकरणात मनोहर भोईर यांच्यासह ७ जणांना अटक

# बेलापूर न्यायालयाने जमिनमंजूर केल्याने तळोजा कारागृहातून ७ ही जणांची सुटका

**उरण । विठ्ठल ममताबादे**

२००७ च्या सेझ विरोधी आंदोलन प्रकरणी उरणचे माजी आमदार तथा शिवसेनेचे जिल्हा प्रमुख मनोहर भोईर यांच्यासह शिवसेनेच्या ७ कार्यकर्त्यांना बुधवारी अटक करण्यात आली होती.त्यांची तळोजा कारागृहात रवानगी करण्यात आली होती.त्यावर १७ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी बेलापूर न्यायालयाने त्यांना जमिन मंजूर केला आहे.

उरण,पनवेल व पेण तालुक्यातील ४५ महसूली गावातील ३० हजार एकर शेतकऱ्यांच्या जमिनी एसईझेड प्रकल्पासाठी तत्कालिन सरकारने सक्तीने भुसंपादन केल्या होत्या.या प्रकल्पाला शेतकऱ्यांसह शिवसेनेचाही प्रखर विरोध होता.त्यामुळे हा एसई झेड विरोधात शिवसेनेने राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत नेते मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखाली हा शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा सेझ प्रकल्प हटाव या मागणीसाठी कोकणभवन येथील कोकण आयुक्त कार्यालयावर १६ ऑगस्ट २००७ रोजी आंदोलन केले होते.

यामध्ये आंदोलनात अनेक वाहनांची तोडफोड झाली होती.या संदर्भात सिबीडी पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाल्यानंतर सरकारी कामात अडथळा केल्याच्या आरोप या आंदोलकांवर ठेवण्यात आला होता.तब्बल १७ वर्षे न्यायालयात सुनावणी सुरु होती.या सुनावणीला वारंवार समन्स देऊनही गैरहजर राहत असल्याने संबंधिताना १६ ऑक्टोबर रोजी वारंट काढण्यात आले होते.या प्रकरणी ७ जणांना बेलापूर न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली होती.त्यांना १७ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी बेलापूर न्यायालयाने जमीन मंजूर केला असून,तळोजा कारागृहातून संबंधितांची सायंकाळी सुटका करण्यात आली आहे.त्यामुळे शिवसेना कार्यकर्त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला.

उरणचे माजी मनोहर भोईर यांच्यासह शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख नरेश रहाळकर,तालूका प्रमुख संतोष ठाकूर,माजी सभापती विश्वास म्हात्रे,रामचंद्र देवरे,पद्माकर तांडेल व गुरुनाथ पाटील यांनी अटक झाल्याने ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये नैराश्य पसरले होते.त्यामुळे ही बातमी समजताच शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख दिनेश पाटील,संपर्क प्रमुख महादेव घरत,संघटक बी.एन.डाकी,दिपक भोईर,रुपेश पाटील,महेश वर्तक यांच्यासह कार्यकर्त्यांनी बेलापूर येथे गर्दी केलीहोती.

सेझ विरोधी लढा हा शेतकऱ्यांच्या जमिनीवर बुलढोझर फिरवणारा होता.त्यामुळे शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी हे आंदोलन करण्यात आले होते.त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांनी राजकारण केले की काय ? असा सवाल शिवसेनेकडून करण्यात येत आहे.



## पाटोदा वन क्षेत्रामध्ये वन्यजीवन सप्ताह उत्साहात संपन्न




**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

वन परिक्षेत्र कार्यालय पाटोदा अंतर्गत वन्यजीवन सप्ताहात विविध उपक्रम राबवून सप्ताह साजरा करण्यात आला.बीड विभागीय वनाधिकारी अमोल गर्कळ व पाटोदा वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एस.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा वन क्षेत्रामध्ये वन्यजीवन सप्ताह साजरा केला. सप्ताहमध्ये शालेय विद्यार्थ्यांना शाळेत वन्यजीवन सप्ताहाचे महत्त्व पटवून देण्यात येऊन सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.तसेच या निमित्त निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले.वन्यजीवन सप्ताहाची सांगता शिरूर तालुक्यातील तागडगाव येथील सर्पज्ञानी प्रकल्प येथे करण्यात आला.तसेच या ठिकाणी श्रीमती सृष्टीताई सिद्धार्थ सोनवणे यांच्या उपस्थितीमध्ये सराटी पक्षी निसर्ग अधिवासामध्ये सोडवण्यात आला व सप्ताह सोहळा निसर्गरम्य वातावरणात साजरा करून वन्यजीवन सप्ताह यशस्वी करण्यासाठी ए.ए.देवगुडे वनपाल पाटोदा तसेच वनरक्षक एन.के.काकडे,एस.आर.राठोड,जी.बी.सानप,राजेश जोशी व वनमजूर सोपान येवले,रामेश्वर बेद्रे,शेख सत्तार, शिवाजी आघाव,सातपुते,विजय जाधव,शहादेव पवार,सतीश गर्जे,भिमराव सव्वाशे,शामराव देवकर,पांडुरंग दानवले,दिलीप शहाणे,शेख बशीर आदींनी परिश्रम घेतले.

# महाडमध्ये ६८वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

**महाड । प्रतिनिधी**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया आणि भारतीय बौद्ध महासभा, तालुका शाखा महाड यांच्या संयुक्त विद्यमाने ६८वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, चवदार तळे येथे आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुनील जाधव यांनी भूषवले.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित व पीडित समाजाला बौद्ध धम्माची दीक्षा देऊन समानतेचा अधिकार दिला होता. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.समता सैनिक दल यांच्यातर्फे बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली. यानंतर डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे



वाचन करण्यात आले. कार्यक्रमात धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून उलगडले. या कार्यक्रमात संजय सोनावणे (पर्यटन सचिव, महाराष्ट्र), नवनीत साळवी (सरचिटणीस, रायगड), विश्वनाथ सोनावणे (माजी अध्यक्ष, महाड), सजन पवार (मार्गदर्शक), महेंद्र शिर्के (माजी अध्यक्ष, महाड) आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. संजीव पवार, संतोष जाधव (सचिव), मोहन धोत्रे, रमेश पवार, विश्वास यादव, चंद्रकांत शिर्के, सुभेदार भा. साळवी, विलास जाधव, सिद्धार्थ सकपाळ, दिलीप तांबे, सुरेंद्र जाधव, बाळाराम साळवी, सुधीर पवार, प्रवीण धोत्रे, सुमेध साळवी, महाड तालुका कमिटी अध्यक्ष सुनील जाधव, जीवन साळवी (सरचिटणीस)आणि सचिन जाधव (उपाध्यक्ष ) या मान्यवरांनी देखील सहभाग घेतला. कार्यक्रमात महिला सभासद आणि समता सैनिक दल मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या पवित्र दिनाच्या निमित्ताने सर्व उपस्थितांनी बाबासाहेबांनी दिलेल्या समानतेच्या आणि मानवतेच्या संदेशाचे स्मरण केले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी बौद्ध धम्माची शिकवण जीवनात आचरणात आणण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### वाचन ही सर्वश्रेष्ठ प्रेरणा शक्ती-डॉ हनुमंत सौदागर

# युसूफवडगाव हायस्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

**केज । सचिन भालेराव**

प्रत्येक मनुष्याचे आयुष्य घडविण्यात वाचनाची आवड हेच महत्त्वाचे कारण ठरले आहे. वाचनाशिवाय ज्ञान नाही आणि ज्ञानाशिवाय महान कार्याची सिद्धता नाही. महापुरुषांकडे वाचन हेच सर्वश्रेष्ठ प्रेरणा शक्ती होती असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.भारतरत्न डॉ एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती म्हणजेच वाचन प्रेरणा दिनानिमित्त ते पैठण येथील वडगाव हायस्कूल वडगाव भाग शाळा येथे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष जनार्धन चौधरी, प्रमुख उपस्थिती मुख्याध्यापक अनंत तरकसबंद यांची होती

पुढे बोलतांना ते म्हणाले भारतरत्न डॉ कलाम यांचा निस्वार्थीपणा, संशोधन वृत्ती




सामाजिकिता असे महान विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत विद्यार्थ्यांनी आवडीनुसार वाचन करावे. चांगले वाईट यामधील फरक समजून घ्यावा. पर्यावरणाचे संवर्धन करावे शिक्षणातून चांगला माणूस घडायला हवा असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनंत तरकसबंद यांनी केलेकार्यक्रम यशस्वीतेसाठी सहशिक्षक श्री इंगळे श्री धायगुडे यांनी परिश्रम घेतले

आभार श्री इंगळे यांनी मानले.

# श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळास मंजुरी मिळाल्याने हंसराज अहीर यांचा चंद्रपूर जिल्हा गवळी समाजाद्वारे सन्मान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र गवळी समाज संघटना रजि .नं. ५४९ च्या माध्यमातून मागील अनेक वर्षांपासून गवळी समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व रोजगारभिमुख उत्थानाकरिता श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून या समाजाला न्याय देण्याची मागणी करण्यात येत होती. समाजाचे मार्गदर्शक नेतृत्व, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे विद्यमान अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या सक्षम नेतृत्व व पुढाकाराने सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असलेल्या महायुती सरकारने नुकतेच गवळी समाज बांधवांकरीता श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळाची घोषणा केल्याने चंद्रपूर जिल्हा गवळी समाज संघटनेच्या पदाधिकारी व समाजबांधवांनी समाजाचे भुषण हंसराज अहीर यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. दि. १२ ऑक्टोंबर २०२४ रोजी हंसराज अहीर यांच्या कार्यालयात जावून समाज बांधवांनी त्यांच्या समाजाभिमुख कार्याचा गौरव करून त्याचे आभार मानले गवळी समाजाच्या न्यायोचित मागण्याबाबत हंसराज अहीर यांनी वेळोवेळी शासनस्तरावर पाठपुरावा करीत अनेक महत्वपूर्ण मागण्याची पूर्तता करवून घेण्यात मोठे योगदान दिल्याने त्यांच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा प्राप्त झाल्याचे अनेक समाज बांधवांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. अहीर यांनी या सन्मानासाठी संघटनेचे राज्यस्तरीय पदाधिकारी व अनेक समाजबांधवांचे अविश्रांत परिश्रम कारणीभूत ठरल्याचे सांगत गवळी समाजाच्या न्याय मागण्यांप्रती आपण सदैव प्रयत्नशील राहू असे त्यांना भेटलेल्या शिष्टमंडळास आश्वासन दिले.याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष गौतम यादव, किसनलाल कालीवाले, दयानंद बंकुवाले, प्रकाश चांभारे, बबन बाखरवाले, अरविंद चौधरी, गुलाब यादव, जगदीश दंडेले, घनश्याम यादव, माताबादल यादव, सुरेश दंडेले, विलास देशवाले, नरेंद्र अकोलेवाले, सुरेश यादव, कमल कजलीवाले, श्याम काटेवाले, शामकांत यादव, शिवम देशवाले, सुभेदार यादव, शिवम देशवाले, अजय यादव, अनिकेत दंडेले, विक्रम बाखरवाले, सनी कोल्हापूरे, मंथन नंदवंशी, अखिलेश चौधरी यांचेसह अन्य समाजबांधव उपस्थित होते

### ज्यांनी लोकसभेत दिली पंकजा ताईंना साथ

# त्याच्या पाठीशी आता उभा करु संपूर्ण बालाघाट-पवन कुचेकर

**चौसाळा । प्रतिनिधी**

सध्या विधानसभेचे बिगुल वाजले असुन २० ऑंक्टोंबर रोजी विधानसभेसाठी मतदान होणार असल्याची निश्चित तारीख निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत बीड विधानसभेसाठी ज्या उमेदवारांने आदरणीय पंकजा ताई मुंडेंना लोकसभा निवडणुकीत सर्वथा मदत केली अशा उमेदवारांच्या पाठी आता भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर हे खंबीरपणे उभे राहतील हे त्यांनी प्रसार माध्यंमाशी बोलतांना सांगीतले आहे. पवन कुचेकर म्हणजे बालाघाटच्या डोंगर रांगेतील तरुण नेत्रुत्व होय,जनसामान्यांचे प्रश्न धडाडीने अर्ध्या रात्री सोडवणारा सच्चा,निस्वार्थी कार्येकर्त्तो म्हणून उभ्या बालाघाटला पवन कुचेकर परिचित आहेत. पवन कुचेकर यांच्या निस्वार्थी जनसेवेची दखल घेऊन भाजपा पक्षाच्या पंकजाताई मुंडे यांनी त्यांना भाजपा



अनुसूचित जाती मोर्चाचे बीड तालुकाध्यक्ष पद देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केलेला आहे, आणी आपल्यावर टाकलेल्या विश्वासाला ईमाने इतबारे काम करुन जनसेवेचा वसा पवन कुचेकर अहोरात्र चालवतात.गत लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडेच्या पाठीशी अवघा बालाघाटचा मतदार आणी तरुणांची फौज उभी करण्यात पवन कुचेकरांचा सिंहाचा वाटा आहे. पंकजा ताई सत्तेत असो वा नसो परंतु पवन कुचेकर सारख्या जनसामान्यांतील कार्यकर्त्यांमुळे पंकजाताई ताईचे कार्य गाव,वाडी,वस्ती, शहरातील नागरिकांपर्यंत पोहचते हे त्रिकालबाधीत सत्य आहे. आत्ताच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या पंकजाताई मुंडेच्या विजयासाठी पवन कुचेकर यांनी अख्खा परिसर पिंजुन काढत ताईंच्या पारडयात बालाघाटचे मतदान पाडले होते. दलित, वंचित ,कष्टकरी, गावखोर्यात राहणाऱ्या सर्व समाजाच्या नागरिकांच्या सुख:दुखात अहोरात्र धावुन जाऊन फुंकर घालणार्या पवन कुचेकरांच्या शब्दावर बालाघाटची माणसे आपला घरचा माणूस म्हणून विश्वास करतात हे पवन कुचेकर यांनी कमावलेले धन आहे. लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडेंचा निसटता पराभव जरी झाला असला तरीही, बालाघाटच्या गाव ,वाडी,तांडा,वस्ती मधल्या नागरिकांचे मतदान फक्त नी फक्त आपल्या ताईंना करण्याच्या आवाहनावरुन ताईंच्या पदरात उभ्या बालाघाटने मताचे दान केले होते हे सर्वश्रुत आहे. लोकसभेच्या मतदाना वेळी अनेक राजकीय नेत्यांनी आदरणीय पंकजाताई यांच्या विजयासाठी परिश्रम घेतले होते.आता विधानसभा निवडणुकांमध्ये ज्या ज्या राजकीय धुरंधरांनी पंकजाताई साठी कष्ट घेतले आहेत, त्यांच्या साठी आता बालाघाटच्या डोंगररांगेतील। पवन कुचेकरांची खंबीर साथ असणार आहे, ताईंच्या विजयासाठी ज्यांनी काम केले त्यांच्या पाठिशी तरुणांच्या फोजैसह नागरिकांच्या मतदान रुपी आशिर्वादासाठी पवन कुचेकर आता तयार झाले असून,लोकसभेत ज्यांनी दिली पंकजाताईंना साथ,त्यांच्या पाठिशी आता बालाघाट असे प्रतिपादन पवन कुचेकर यांनी प्रसारमाध्यमांना दिले आहे.

# राज्यस्तरीय ग्रिको रोमन कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेत विभागीय १७ वर्ष वयोगटातील ९२ किलो वजनातील ग्रीको रोमन या प्रकारच्या कुस्ती स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून प्रथम येऊन श्री घृष्णेश्वर विद्यालय खुलताबाद चा विद्यार्थी हर्षवर्धन बाळासाहेब नागे (इयत्ता १०वी) याची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. (विशेष बाब म्हणजे राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेतही ब्रांझ मेडल या विद्यार्थ्यांनी प्राप्त केले होते त्याबद्दल त्याचे). विवेकानंद शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संस्थेचे सहसचिव श्रीमंतराव( तात्यासाहेब)शिसोदे पाटील अध्यक्ष अक्षय भाऊ शिसोदे पा., उपाध्यक्ष अमर भाऊ शिसोदे पा., कोषाध्यक्ष तुषार भाऊ शिसोदे पा., सचिव यशोद भाऊ शिसोदे पा., प्रशासकीय अधिकारी प्रभाकरराव मोरे साहेब व विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक संजय वरकड सर,पर्यवेक्षक लोहगळे सर, हजारे सर ,इंगळे सर, नागपुरे सर, गायकवाड सर, आढाव सर ,राठोड सर, सूर्यवंशी सर ,तांबे सर ,मुंडे सर,पुंगळे सर,पाटील सर,मगरे



सर, बागडे सर, भगस सर,धारे सर, मोरे सर, घारे सर, बोडके सर, माळे सर, दराडे सर,भोसले मॅडम, मेवाळ मॅडम,पारधी मॅडम, धीवर मॅडम सर्व शिक्षक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी कोलते मामा, आढाव मामा,रवी सावजी यांनी अभिनंदन केले व राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# आमदार शहाजीबापू पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोला शहरातील अनेक युवासेनेच्या शाखांचे उद्घाटन संपन्न

## आमदार शहाजीबापू पाटील यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुक्याचे लोकप्रिय आमदार शहाजीबापू पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सांगोला शहरात अनेक युवासेनेच्या शाखांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले. यावेळी आम.शहाजीबापू पाटील यांच्या कार्यावर आधारित सागर विजय माने लिखित ,निर्माता सुभाष जगदने ,गायक गरुडा गुलीक यांच्या टीमच्या ध्वनीगीताचा प्रसारण कार्यक्रम संपन्न झाला. आमदार शहाजी भाऊ पाटील यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त अनेकांनी शुभेच्छा व्यक्त केल्या

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक व शिवसेनेचे पदाधिकारी शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे , विधानसभा प्रमुख प्रा. संजय देशमुख, शिवसेनेचे ज्येष्ठनेते आनंदकाका घोंगडे यांनी शाखा उद्घाटन प्रसंगी सांगितले की ,स्व.बाळासाहेब ठाकरे ,स्व.धर्मवीर आनंद दिघे यांची प्रेरणा घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ,आमदार शहाजीबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला शहरात शिवसेनेच्या युवा शाखांचे मोठ्या थाटामाटात उद्घाटन झाले. युवासेनेचे नूतन पदाधिकाऱ्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने पुढे येऊन धाडसाने कार्य करत राहावे .कार्यकर्त्यांच्या अडी अडचणी प्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी सर्वतोपरी सहकार्य व मदत करतील. या शाखांच्या माध्यमातून तसेच शिवसेनेच्या माध्यमातून संघटनात्मक बांधणी करणे हा दृष्टिकोन आहे. पक्ष शाखा हीच पक्षाची खरी ताकद आहे. शिवसेना शहर संघटक आनंदा माने मित्र परिवारांची टीम मोठी असून पक्षाला खऱ्या अर्थाने ताकद देण्याचे काम ही संघटना करणार आहे.आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगोला तालुक्याचा चौफेर विकास करण्यासाठी ५ हजार कोटीहून अधिक निधी मंजूर करून आणला. त्यामुळे गोरगरिबांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असून तालुक्यात अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. आमदार शहाजीबापू पाटील यांना आमदार व नामदार करण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावूया असे आवाहन करण्यात आले. सांगोला शहरात युवासेनेच्या शाखांचा उद्घाटन सोहळा शिवसेनेतील मांन्यवर व पदाधिकारी यांच्या



हस्ते करण्यात आले या कार्यक्रमासाठी युवासेना शाखेचे नूतन पदाधिकारी आमदार शहाजी बापू पाटील प्रेमी व आनंदा भाऊ माने मित्रपरिवार तसेच कार्यकर्ते नागरिक यांची उपस्थिती होती . युवासेना शाखांचे उद्घाटन युवासेना जिल्हा संपर्कप्रमुख सागरदादा पाटील, शिवसेना नेते दिग्विजयदादा पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, शिवसेना विधानसभा प्रमुख प्रा. संजय देशमुख, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आनंदकाका घोंगडे ,शिवसेना शहरप्रमुख माऊली तेली, शिवसेना शहर संघटक आनंदाभाऊ माने, शिवसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख राणीताई माने ,शिवसेना शहरप्रमुख महिला आघाडी छायाताई मेटकरी शिवसेना शहर उपप्रमुख अस्मिर तांबोळी, शिवसेना शहर उपप्रमुख विजय इंगोले, शिवसेना समन्वयक अरुण बिले ,शिवसेना शहरप्रमुख एस. सी सेलचे कीर्तीपाल बनसोडे, शिवसेना उपतालुकाप्रमुख सोमनाथ मगर ,एस.सी सेलचे शहर समन्वयक शरद रणदिवे, शिवसेना शहर उपप्रमुख गणेश माळी, शिवसेना शहर उपप्रमुख महेश कदम ,मायाक्का प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिलिंग गावडे, उद्योगपती सचिन सदगिले, उद्योगपती सुनील धतिंगे, शिवसेना शहर सहसंघटक अरुण पाटील, शिवसेना शहरप्रमुख ओबीसी सेलचे आयुब मुलाणी, देविदास गावडे ,ज्ञानेश्वर गाडेकर,अनेकयुवासेना शहर उपप्रमुख काशिलिंग गाडेकर, युवासेना शहर उपप्रमुख सागर नरुटे शिवसेनेचे दीपक ऐवळे, इनामदार गुरुजी, बिटू मुलाणी अण्णा गडदे, समाधान सावंत, सागर माने ,सुभाष जगधने मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यामध्ये सांगोला शहरातील युवासेना शाखा अहिल्यानगर, युवासेना शाखा जयभवानी चौक, युवासेना शाखा पुजारवाडी , युवासेना शाखा सनगरगल्ली, युवासेना शाखा इंदिरानगर वसाहत ,युवासेना शाखा वंदेमातरम चौक, युवासेना शाखा संजयनगर शाखा नं - १ ,शिवसेना शाखा संजयनगर शाखा नं २ ,युवासेना शाखा वाढेगाव नाका, युवा सेना शाखा आनंदनगर सांगोला या शाखांचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी युवासेना शाखा पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार व सन्मान करण्यात आला.


# पुन्हा त्या विद्यार्थ्यांच्या नशिबी तराफ्याचा जीव घेणा प्रवास

## आज्ञातांकडून मिळालेल्या बोटीची तोडफोड

## गंगापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

भिवधानोरा ता.गंगापूर येथील जुने धानोरा पलिकडील दाट वस्तीवरील विद्यार्थ्यांना शिवना निदीचा मोठा प्रवाह ओलांडून तरफ्याचा जीवघेणा प्रवास करावा लागत होता.या जीवघेण्या प्रवासाची विविध माध्यमाने दखल घेऊन शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मा.आमदार भाई सावंत यांच्या स्मरणार्थ पाण्यातून प्रवास करण्यासाठी बोट देण्यात आली होती.परंतु या बोटीची अज्ञातांनी कोडापुर शिवारात नेऊन तोडफोड केली आहे. या खोडसाळ वृत्तीमुळे आता विद्यार्थ्यांच्या नशिबी पुन्हा एकदा तराफ्याचा जीवघेणा प्रवास आला असून भिव धानोरा पलीकडील पालक विष्णू काळे यांनी गंगापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.काळे यांच्या फिर्यादी वरून आई भामाबाई व मुलगा पवन पुतण्या नितिन यांना दवाखान्यात भिवधानोरा येथे जाणे असल्याने ते शिवना नदीचे काठी गेले तेथे त्यांना बोट दिसली



नसल्याने त्यांनी मला फोन करुन बोट नसल्याचे सांगितले.मी तेथे येवुन आजुबाजुला शोध घेतला.परंतु बोट निदर्शनास न आल्यामुळे परिसरातील मच्छीमारांना कळविले होते. त्या नंतर थोड्या वेळातच स्थानिक मच्छीमार यांनी याने मला फोन करून सांगितले की सदर बोट ही जायकवाडी संपादित क्षेत्रातील उसाच्या शेतात पाण्यात बुडालेली आहे.असे कळविल्याने मी जावुन पाहिले असता बोट दिसली परंतु ती तिची फोडतोड झाल्याने सदर बोटेचे अंदाजे दोन लाख रुपयाचे नुकसान झालेले आहे. बोट कोणीतरी अज्ञात ईसमाने खोडसाळ पणाने नेवुन तिची फोडतोड करुन तिचे नुकसान केले आहे. काळे यांच्या फिर्यादीवरून गंगापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गंगापूर पोलीस हे करत आहे.

## सह्याद्री फार्मसीच्या डी.फार्मसी विद्यार्थ्यांची

# उपज़िल्हा आरोग्य रुग्णालय पंढरपूर एआरटी केंद्रास तसेच मेडिकल्स यांना भेटी

**सांगोला । प्रतिनिधी**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष डी.फार्मसी विद्यार्थ्यांनी उपज़िल्हा आरोग्य रुग्णालय पंढरपूर तसेच एआरटी सेंटर पंढरपूर याना भेटी दिल्या.फार्मसी क्षेत्राची सर्वोच्च नियामक संस्था पी.सी.आय नवी दिल्ली यांनी डी.फार्मसी अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल केला आहे. नवीन अभ्यासाअंतर्गत हॉस्पिटल अँड क्लिनिकल फार्मसी विषयांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना आरोग्य केंद्रास भेटी देऊन रुग्णांना विविध देण्यात येणाऱ्या सेवा व सुविधा यांची माहिती घेऊन फार्मासिस्ट (औषधनिर्माता) याचे कार्य व जबाबदारी व महत्व याविषयी माहिती घ्यावी लागते व त्याचा भविष्यात त्यांना लाभ व्हावा हा हेतू आहे.त्यानुसार विद्यार्थ्यांनी उपज़िल्हा आरोग्य रुग्णालय पंढरपूर तसेच एआरटी सेंटर पंढरपूर याना भेटी देऊन सर्व माहिती संग्रहित केली.तसेच केंद्रातील उपलबद्ध विद्युत उपकरणे,दैनंदिन रुग्णओपचार व विविध औषधे,रुग्णओपचाराच्या विविध पद्धती,रुग्णांसाठी असणाऱ्या सेवा सुविधा,औषधनिर्माण अधिकारी व



औषधनिर्माता यांचे कार्य व जबाबदारी या संभंधित माहिती घेतली. उपज़िल्हा आरोग्य रुग्णालय पंढरपूरचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सयाजीराव गायकवाड,डॉ.जयश्री ढवळे,आरोग्यसाहीका वर्षा गायकवाड,औषधनिर्माण अधिकारी सचिन चंदनशिवे व त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नास समर्पक उत्तरे उपस्थित अधिकारी वर्गाने दिली.त्याबद्दल सर्वांनी त्यांचे आभार मानले.त्यांनतर विद्यार्थ्यांनी पंढरपूर शहरातील शिवकृपा मेडिकल अँड जनरल स्टोअर्स या रिटेल तसेच व्होरा मेडिकल्स या होलसेल औषध दुकानास भेटी देऊन सर्व औषधांची माहिती घेतली तसेच औषधांची खरेदी,साठवणूक,विक्री,आर्थिक नियोजन,शासनाचे विविध नियम व अटी या संबंधित सर्व माहिती व्होरा मेडिकल्सचे सुदेश व्होरा व संकेत व्होरा यांनी दिली.हि भेट यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एस.पाटील,प्रा.सौ.एस.एम.पवार, प्रा.वाय.एल.शिंदे प्रा.ए.आर.पवार, प्रा.एस.जे.खर्चे, प्रा.पी.जि.माळी, प्रा.पी.एन.बंडगर यांचे योगदान लाभले.

# हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे विदर्भ विभागीय अध्यक्षासह सात जिल्हा अध्यक्ष जाहीर

## महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी केली घोषणा

**जालना । असलम कुरेशी**

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशन महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची बैठक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा, संघटनेचा विस्तार व आगामी कार्यक्रमावर चर्चा करण्यात आली.


यावेळी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या सहमतीने हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या विदर्भ विभागीय अध्यक्षांसह विविध सात जिल्हा अध्यक्षांची घोषणा केली.

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या विदर्भ विभागीय अध्यक्ष पदी नागपूरचे जेष्ठ पत्रकार




हाजी मो. तारेक शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच नागपूर जिल्हा अध्यक्ष पदी देवेंद्र मुरकुटे, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्हा अध्यक्ष पदी शामका चव्हाण, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष पदी मिर्झा अक्रम बेग, अमरावती जिल्हा अध्यक्ष पदी अब्दुल मुबिन शेख, वाशिम जिल्हा अध्यक्ष पदी फय्याज कुरेशी, गोंदीया जिल्हा अध्यक्ष पदी गौरव कुमार आणि वर्धा जिल्हा अध्यक्ष पदी तन्वीर खान यांची नियुक्ती केल्याची माहिती आयेशा खान मुलानी यांनी दिली. नवनियुक्त पदाधिऱ्यांचे हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, महाराष्ट्र प्रदेश महासचिव विनोद भोकरे, महाराष्ट्र प्रदेश सचिव जावेद पठाण, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रणजितसिंह ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रियाज शेख, महाराष्ट्र प्रदेश सहसचिव शेख शकिल (जळगांव), मराठवाडा प्रवक्ता रहिम पठाण औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), विदर्भ प्रवक्ता सय्यद जावेद, महाराष्ट्र प्रदेश मिडिया प्रभारी अमजद पठाण, महाराष्ट्र प्रदेश कोषाध्यक्ष मुज़म्मील कुरेशी, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य फहिम भाई शेख, शुजाअत कुरेशी, राम काडवते, उमेश गोधने, महेश भैराम, धनंजय तरारे आदींनी अभिनंदन केले

# विडा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेने खोकडाचे पिल्लू ठार



**केज। सचिन भालेराव**

विडा-देवगाव रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेने खोकडाचे पिल्लू ठार झाल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी मृत पिल्लू ताब्यात घेऊन दफन केले.

विडा-देवगाव रस्त्यावरील इप्परवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ अज्ञात वाहनाने धडक दिल्याने खोकडाचे अंदाजे सात महिन्याचे पिल्लू ठार झाल्याचे गुरुवारी सकाळी ९.३० वाजता निदर्शनास आले. त्यानंतर विनोद ढोबळे यांनी वन विभागास माहिती देताच वनरक्षक नवनाथ पाईक व वनमजुर वचिष्ट भालेराव यांनी घटनास्थळी धाव घेतली. खोकडाचे मृत पिल्लू ताब्यात घेऊन विडा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात आणले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. माया वाकळे यांनी शवविच्छेदन केल्यानंतर वनरक्षक नवनाथ पाईक व वनमजुर वचिष्ट भालेराव यांनी विडा शिवारात वन विभागाच्या जमिनीत मृत पिल्लू दफन केले.

# यादराखा एखाद्या लेकी बाळीची छेड काढालं तर सतिश भोसले त्यांचा मोठा भाऊ म्हणून पाठीशी उभा

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

गेल्या काहीं दिवसापासून शहरातील कॉलेजच्या बाहेर कॉलेज सुटल्यानंतर मुलींची छेड छाड करण्याचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे बऱ्याच मुलींनी शाळेला व कॉलेजला येणे बंद केले.त्यामुळे काहीं पालकांनी व विद्यार्थिनींनी सामाजिक कार्यकर्ते सतिश भोसले यांच्याशी संपर्क साधून या रोड रोमिंयोची माहिती दिली काल त्यांनी येथील महाविद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांना समजावून सांगितले व पुन्हा ताकीद सुद्धा दिली की, याद राखा एखाद्या लेकीबाळीची छेड काढली तर सतिश भोसले त्यांचा मोठा भाऊ म्हणून त्यांच्या पाठीशी उभा आहे. अश्या मजनूची गैर केली जाणार नसून पालकांनी आपल्या मुलांना समजावून सांगावे नसता याचे परिणाम वाईट होतील असा सज्जड दम देखील दिला.

शहरात श्री कालिका देवी विद्यालय,जिल्हा परिषद माध्यमिक शाळा,कन्या शाळा,शहराच्या जवळच महात्मा फुले विद्यालय, आयडीयल इंग्लिश स्कुल या ठिकाणी हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळा विद्यालय व कॉलेज कॅन्पसमध्ये जरी सुरक्षितता असली तरी बाहेर चौकात, बस स्टॅन्ड परिसर अश्या ठिकाणी हे प्रकार सातत्याने घडत होते. महाविद्यालयीन प्राचार्य व प्राध्यपाकांनी कित्येकदा ताकीद पण दिल्या.पण बदल न झाल्याने कित्येक मुलींनी शाळा, महाविद्यालयात येणे बंद केले.त्यामुळे काहीं विद्यार्थिनीं व पालकांनी सामाजिक कार्यकर्ते सतिश भोसले यांना ही गोष्ट सांगितली. त्यांनी लगेच महाविद्यालय गाठत अश्या परिसरात कुणी जर रोड रोमिंयोंनी एखाद्याच्या मुलीची छेड अथवा काहीं खोड केली तर याद राखा त्यांचा मोठा भाऊ म्हणून सतिश भोसले त्यांच्या पाठीशी उभा असून पालकांनी आपल्या मुलांना समज द्यावी नसता उदया मला जर असा कुणी आढळला अथवा एखाद्या मुलीची तक्रार आली तर गंभीर प्रकाराला सामोरे जावे लागेल. यामुळे मुलीमध्ये धीर आला असून त्या महा विद्यालयात नव्हे तर महाविद्यालया बाहेर सुद्धा आता सुरक्षित राहतील अशी पालकांनी अपेक्षा व्यक्त केली



# काापड व शिलाईचा दर्जा निकृष्ट, एक राज्य, एक गणवेश योजनेचा उडाला फज्जा

## शालेय व्यवस्थापन समिती व पालकांचा गणवेश स्विकारण्यास नकार

**जालना । असलम कुरेशी**

राज्य सरकारच्या २०२४-२५ शैक्षणिक वर्षापासून एक राज्य, एक गणवेश योजनेचा फज्जा उडाला आहे. दोन गणवेश जून महिन्याच्या ऐवजी ऑक्टोबर महिन्यात एक गणवेश मिळत आहेत. त्याचे कापड निकृष्ट दर्जाचे, शिलाई निकृष्ट दर्जाची आहे. गणवेश रचनेनुसार विद्यार्थ्यांच्या शर्टवरती शोल्डर स्ट्रीप नाहीत. दोन खिसे ऐवजी एकच खिसा लावला आहे. शर्टचे कापड हलक्या दर्जाचे असल्याने गणवेश अंगात घालताच फाटत आहे. पहिल्याच दिवशी शिलाई उधडत आहे. असे गणवेश वर्षभर टिकणार कसे? असा प्रश्न शिक्षक व पालकांसमोर उभा ठाकला आहे.

२०२४-२५ शैक्षणिक वर्षापासून एक राज्य एक गणवेश योजनेच्या अंमलबजावणीसाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे १८ ऑक्टोबर २०२३ रोजी शासन निर्णय काढण्यात आला. त्यात, शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना एकसमान रंगाचे दोन गणवेश शाळा उघडण्याच्या पहिल्या दिवशी देण्यात यावेत. स्काऊट व गाईड विषयाला अनुरूप मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाची हाफ पॅन्ट तसेच मुलींना आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा स्कर्ट किंवा सलवार, कमीज अशी रचना ठरली. त्यापैकी एका गणवेशाला विद्यार्थ्यांच्या शर्टवरती शोल्डर स्ट्रीप व दोन खिसे असावे, असे निर्देश देण्यात आले. प्रत्यक्षात योजनेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी समोर आल्या आहेत.

एक रंग, एक दर्जा करिता प्राथमिक शिक्षण परिषदेतर्फे ई-टेंडर प्रक्रियेद्वारे सर्वात कमी रकमेच्या टेंडरमधून निकृष्ट दर्जाचे कापड खरेदी करण्यात आले. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहकार्याने स्थानिक महिला बचत गटातर्फे गणवेश शिलाईचे काम देण्याचे ठरले. परंतु, शिलाईला विलंब झाल्याने महिला बचत गटांबरोबर खासगी ठेकेदाराकडून गणवेशांची शिलाई करण्यात आली. त्यात शर्टच्या शोल्डर स्ट्रीप व एक खिसा गायब झाला.

गुरूवारी घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेत शालेय व्यवस्थापन समिती व पालकांशी शिक्षकांसमोर गणवेशाच्या तक्रारीचा पाढा वाचला. कापड हलक्या दर्जाचे आहे. विद्यार्थ्यांनी अंगात घालताच काही गणवेश फाटत आहे. गणवेश आडमाप शिवलेले आहे. वरच्या वर्गाचे गणवेश खालच्या वर्गाला द्यावे लागत आहे. शर्टचा अर्धा भाग गडद व अर्धा भाग फिकट आकाशी रंगाचा, तकलादू लांब अंतराची शिलाई असल्याचे पालकांनी सांगितले. यासंदर्भात अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेने 'मुलांना फूल पॅन्ट व मुलींना सलवार कमीज मिळावा. मुलींना स्कर्ट व मुलांना हाफ पॅन्ट असा गणवेश नको, असे स्पष्टपणे सांगितले. या निकृष्ट गणवेशामुळे शिक्षक व पालकांमध्ये नाराजीचे वातावरण दिसत आहे.



## जागतिक अंध दिनाचे औचित्य साधून मराठवाड्यातील दीडशे अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई येथील बीअँड व्हीजन फाउंडेशन लातूरच्या वतीने राजस्थानी मंगल कार्यालयात मराठवाड्यातील दीडशे अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण करण्यात आले. अंध व्यक्ती विषयी जनजागृती कार्यक्रम १५ ऑक्टोबर रोजी मंगळवारी संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉक्टर माधव गोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई येथील मानवलोक संस्थेचे कार्यवाहक अनिकेत लोहिया आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पुरुषोत्तम चोपडा हे होते. बीअँड व्हीजन फाउंडेशन ही संस्था सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तीसाठी शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, साहित्य, मनोरंजन, सांस्कृतिक व सामाजिक पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत असणारी लातूर येथील सेवाभावी



संस्था असून उद्देशपूर्तीसाठी राज्यभरात विविध कार्यक्रम राबवत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर माधव गोरे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात दिली. अनिकेत लोहिया यांनी याप्रसंगी मार्गदर्शन पर भाषण केल. याप्रसंगी अंबाजोगाई येथील श्री सुहास पाठक आणि मित्र परिवारातर्फे मराठवाड्यातील अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण अनिकेत लोहिया आणि पुरुषोत्तम चोखडा यांच्या हस्ते देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास पाठक, जयप्रकाश भुतडा, राजू चोखडा, ईश्वर भुतडा सोमवंशी महाराज यांचे सहकार्य लाभले. व्यासपीठावर संस्थेचे सचिव संदीप चोपडे, सह सचिव मीरा चोपडे आणि सहसचिव प्रशांत गवंडगावे हे उपस्थित होते.

## उर्दू माध्यम शाळेच्या मुलीसाठी सलवार कमीज व मुलांसाठी फुल पँट शर्ट देण्याची मागणी

**जालना ।असलम कुरेशी**

जालना जिल्ह्यातील उर्दू माध्यम जिल्हा परिषद शाळेतील मुलीसाठी सलवार कमीज व मुलांसाठी फुल पँट शर्ट देण्याची मागणी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना व शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की जालना जिल्ह्यातील उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना दिनांक १० जून २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार समग्र शिक्षा अभियानांतर्गत पहिली ते आठवीच्या मुलींसाठी सलवार कमीज व ओढणी तसेच पालकांच्या विनंती नुसार पहिली ते आठवीच्या मुलांसाठी फुल पँट व शर्ट देण्याची मागणी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना मॅडम व शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांना निवेदनाद्वारे केली. तसेच या विषयावर शिक्षणाधिकारी दातखीळ यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षणाधिकारी दातखीळ यांनी समस्येची संवेदनशीलता समजून तात्काळ गटशिक्षणाधिकारी यांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेऊन संबंधितांना याबाबत आदेश देण्यात येणार असल्याचे ठोस आश्वासन दिले. यावेळी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष जावेद खान, उपाध्यक्ष तालेब कुरेशी, जिल्हा संघटक सय्यद अब्दुल मुकीत, सहसचिव मोहम्मद इकबाल, मोहम्मद आवेज इम्रान, शेख शब्बीर आदी शिक्षक उपस्थित होते.

## बारगजवाडी येथे वाचक दिन साजरा

**शिरुर कासार ।प्रतिनिधी**

१५ ऑक्टोबर हा दिन डॉक्टर अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्याचा दिवस असल्या कारणामुळे कानिफनाथ सार्वजनिक वाचनालय भारत वाडी तालुका शिरूर कासार या ठिकाणी वाचनालयाचे अध्यक्ष लक्ष्मण आघाव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने हा वास्तुद्दीन शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला यानिमित्त शाळेतील विद्यार्थी व शाळेतील मुख्याध्यापक गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रंथपाल ग्रंथालयाचे अध्यक्ष लक्ष्मण आघाव वसुदेव आघाव नंदकुमार बारगजे



आधी प्रतिष्ठित नागरिक विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होऊन हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला यावेळी वाचक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना पुस्तके व खाऊचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती या वाचनाचे अध्यक्ष लक्ष्मण आघाव यांनी दिली भारताचे महामहीम माजी राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती वाचक दिन म्हणून साजरा करण्यात येत असते या वाचक दिनाचे औचित्य साधून शिरूर कासार तालुक्यातील बारगजवाडी येथे शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक व त्यांचे सर्व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा वाचक दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी विविध मान्यवरांची भाषणे देखील झाली लहान मुलांनी व शालेय विद्यार्थ्यांनी कसे वागावे कसे आचरण करावे अशी माहिती याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष लक्ष्मण आगाव यांनी आपल्या भाषेमध्ये सांगितली व हा कार्यक्रम संपन्न झाला.




**मानवत शहरातील रूद्रा चालक, मालक मित्र मंडळाच्या वतीने दूर्गात्सोवातील भाविक भक्तांना मिरवणूकी दरम्यान एक क्विंट्टल स्वादिष्ट खिचडीचे वाटप करण्यात आले. या वेळी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांचासह चालक मालक उपस्थित होते.**

### उद्योगाकांनी रोजगारासाठी स्थानिकांना प्राधान्य द्यावे-उद्योगमंत्री उदय सामंत

# एमआयडीसीमुळे शिर्डी औद्योगिक हब म्हणून नावारूपाला येईल-राधाकृष्ण विखे पाटील

## शिर्डी औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) व डिफेन्स क्लस्टरचे भूमिपूजन

**शिर्डी । प्रतिनिधी**

एमआयडीसी व डिफेन्स क्लस्टरमुळे शिर्डी व परिसरात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहे, उद्योजकांनी स्थानिक युवकांना रोजगारासाठी प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज येथे व्यक्त केली.

सावळी विहीर येथे शिर्डी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) औद्योगिक वसाहतीचे व डिफेन्स क्लस्टरचे भूमिपूजन उद्योगमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार आशुतोष काळे, अहिल्या नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आण्णासाहेब म्हस्के पाटील, शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, निबे लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे आदी उपस्थित होते.

उद्योगमंत्री म्हणाले, येत्या काळात राज्यात पाच ठिकाणी डिफेन्स क्लस्टर सुरू करण्यात येणार आहेत. यातील एक डिफेन्स क्लस्टर शिर्डी औद्योगिक वसाहतीत सुरू करण्यात येत आहे. या डिफेन्स कलस्टरच्या माध्यमातून १ हजार २०० कोटींची गुंतवणूक होणार आहे. येत्या काळात शिर्डी बरोबर कोपरगाव शहरातही औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. राज्य शासनाचे धोरण उद्योगस्नेही आहे. महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक वाढत आहे. रत्नागिरी जिल्ह्यात ३० हजार कोटींचा सेमी कंडक्टर प्रकल्प सुरू होत आहे. यात ८० टक्के स्थानिक तरूणांना परदेशात प्रशिक्षण देऊन या प्रकल्पात कायम नोकरी दिली जाणार असल्याचे उद्योगमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

श्री.विखे पाटील म्हणाले, एमआयडीसी शिर्डी व परिसरातील युवकांसाठी नवा आशेचा किरण आहे. या माध्यमातून हजारो तरूणांना कायमस्वरूपी रोजगार मिळणार आहे. कोपरगावात एमआयडीसी उभारण्यासाठी शेती महामंडळाची ३०० एकर जागा विनाशूल्क उपलब्ध करून दिली जाईल, असे त्यांनी सांगितले.

शिर्डी एमआयडीसीमुळे शिर्डी, राहाता, कोपरगाव या परिसरातील स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. शिर्डी श्री साईबांबा देवस्थान म्हणून जगभर



ओळखले जाते. यापुढे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग येणार असल्याने एक 'औद्योगिक हब' म्हणून उदयास येईल, असा विश्वासही पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार आशुतोष काळे यांचेही यावेळी भाषण झाले. प्रास्ताविक गणेश निबे यांनी केले.अशी साकारणार शिर्डी एम.आय.डी.सी : - सावळीविहीर (ता.राहाता) येथील शेती महामंडळाच्या ५०२ एकर जागेवर शिर्डी एमआयडीसी साकारणार आहे. राहाता तालुक्यातील सावळीविहीर बु. व सावळीविहीर खु. तसेच कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे या गावांच्या क्षेत्रात एमआयडीसीची जागा आहे. शासनाच्या जमिनीवर भूसंपादनाविना विकसित करण्यात येणारी ही राज्यातील पहिलीच एमआयडीसी ठरणार आहे. रस्ते आणि वीज विकासासाठी १०० कोटी रुपयांची मान्यता यापूर्वीच देण्यात आली आहे. शिर्डी औद्योगिक वसाहतीचे हे ठिकाण शिर्डी शहरापासून ५ किलोमीटर, समृद्ध महामार्गाच्या इंटरचेंजपासून केवळ ३ किलोमीटर व साईबाबा (शिर्डी) आंतरराष्ट्रीय विमानतळापासून १४ किलोमीटर अंतरावर आहे. रेल्वेमार्ग, रस्तेमार्ग तसेच हवाईमार्गाने देशभरातील सर्व प्रमुख शहरांना अत्यंत सुलभतेने जोडणारी औद्योगिक वसाहत म्हणूनच भविष्यात उद्योजकांकडून चांगला प्रतिसाद अपेक्षित असल्याचे एमआयडीसी प्रशासनाचे म्हणणे आहे. डिफेन्स क्लस्टरचे वैशिष्ट्य :- शिर्डी एमआयडीसीत आज डिफेन्स क्लस्टरचे भूमिपूजन करण्यात आले. एमआयडीसीच्या २०० एकर जागेत हे क्लस्टर साकार होणार आहे. पुणे स्थित निबे लिमिटेड ही संरक्षण सामग्रीची निर्मिती करणारी कंपनी या क्लस्टरमध्ये पहिला कारखाना उभारणार आहे. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे हे राहाता तालुक्यातील भूमिपुत्र आहेत. यामाध्यमातून एक हजार कोटींची गुंतवणूक होणार असून या क्लस्टरमध्ये शिर्डी व परिसरातील २ हजार तरूणांना थेट नवीन रोजगार उपलब्ध होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077